महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,

गोकुलदास तेजपाल रुग्णालय, ७ वा मजला, क्रॉफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग,

नविन मंत्रालय, मुंबई-४००००१.

दुरध्वनी क्रमांक:-२२६१४००३ संकेतस्थळ : wssd.ws02.gov.in

---

क्र.स्वच्छता-२०२६/प्र.क्र.१३/पापु ०२ दिनांक :-०५ मे,२०२६

(Tender Notice)

## दरपत्रकाबाबतच्या सूचना

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (खुद्द), मंत्रालय, मुंबई या विभागात असलेल्या स्वच्छता कर्मचा-यांची सेवा बाह्ययंत्रणेव्दारे भरण्याचा निर्णय घेण्यात आला असुन खाजगी पुरवठादारांकडून दिनांक **०१ जुन, २०२६ ते दिनांक ३० एप्रिल, २०२७** या कालावधीसाठी मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

पुढे उध्दृत करण्यात आलेल्या दरपत्रकाच्या अटी व शर्ती विचारात घेऊन स्वच्छता पुरविण्याबाबतची दरपत्रके दिनांक **१३ मे, २०२६ वा. सायं. ५.०० वाजेपर्यंत** मोहोरबंद लिफाफ्यात, कक्ष अधिकारी (नोंदणी शाखा), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, गोकुलदास तेजपाल रुग्णालय, ७ वा मजला, क्रॉफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग, नविन मंत्रालय, मुंबई-४००००१. या पत्त्यावर पाठविण्यात यावा.

०१. **मुलभूत अटी व शर्ती:-**

- दि.१ जुन २०२६ ते दि.३० एप्रिल २०२६ या कालावधीकरीता करार करण्यात येणार आहे.
- दोन स्वच्छता कर्मचारी (१ पुरुष, १ महिला) यांची आवश्यकता आहे.
- स्वच्छता कर्मचारी यांची कामाची वेळ सकाळी ८.३०. ते दुपारी ४.३० पर्यत असेल.
- एका पुरवठादारास एकच निविदा सादर करता येईल.
- मोहरबंद लिफाफ्यावर "स्वच्छता कर्मचारी पुरवठा करणेबाबतचे दरपत्रक" असे लिहिणे आवश्यक आहे.
- प्रस्तृत अटी व शर्ती व्यतिरिक्त अन्य आवश्यक अटी व शर्ती, करार करतेवेळी अंतर्भुत करण्याचा अधिकार विभागाकडे असेल.
- प्रस्तृत अटी व शर्ती मान्य असल्याचे तांत्रिक निविदा दरपत्रक मध्ये नमुद असले, तरच निविदाकाराच्या दरपत्रकाचा विचार करण्यात येईल.
-

०२. **लिफाफा संदर्भात अटी व शर्ती:-**

०१.लिफाफ्यावर दरपत्रक धारकाची सही व शिक्का असणे बंधनकार असेल.

०२निविदा सादर करताना लिफाफ्या सोबत रु.२०००/-ना-परतावा शुल्क भरणे अनिर्वाय आहे.त्याची पावती सोबत जोडावी.

०३. निविदादारांकडून दरपत्रके दि.१३ मे,२०२६ सांय.५.००वा. नंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

०४.**लिफाफ्यामधील आवश्यक कागदपत्रे:-**

१. संस्थेची सर्वसामान्य माहिती देणारे कागदपत्र :-

- संस्थेचे नाव
- कार्यालयाचे संपुर्ण पत्ता
- दुरध्वनी क्रमांक
- ई-मेल
- सदर निवेदेसाठी प्रस्तावित असलेल्या अटी व शर्ती मान्य असल्याचे सही व शिक्का अनिवार्य आहे.

०५.**लिफाफा क्रमांक ०१** - तांत्रिक लिफाफासाठीचे आवश्यक कागदपत्रे :-

- महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ नोंदणी प्रमाणपत्र
- जिएसटी नोंदणी प्रमाणपत्र
- आयकर नोंदणी क्रंमाक(पॅन कार्डची प्रत)
- शासकीय /निमशासकीय कार्यालयाना स्वच्छता कर्मचारी करार तत्वावर पुरविल्याचे तीन वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र

०६. **लिफाफा क्रमांक ०२** - आर्थिक लिफाफासाठीचे आवश्यक कागदपत्रे -

उद्योग, उर्जा व कामगार विभाग अधिसुचना क्र. किवेअ- २०१५/४१८/प्र.क्र.४१०/ कामगार-७ दि.२४.०७.२०१९ नुसार तसेच शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१३/ कामगार-८ दि. २२.०२.२०१९ नुसार कर्मचाऱ्यास अनुज्ञेय वेतन व भत्ते बाबत, खालील तपशीलाप्रमाणे आपले दर सादर करावे.

| अ.क्र. | विविध कामगार कायद्यांन्वये वेळोवेळी निश्चित केलेल्या दरानुसार अनुज्ञेय वेतन, भत्ते व वजावटी |
|---|---|
| १. | मूळ वेतन |
| २. | विशेष / महागाई भत्ता |
| ३. | घरभाडे भत्ता |
| ४. | इतर भत्ते |
| ५. | भविष्य निर्वाह निधी (PF) |
| ६. | राज्य कामगार विमा योजना (ESIS) कर्मचारी नुकसान भरपाई (W.C) |
| ७. | व्यावसायिक कर (P.T.) |
| ८. | बोनस |
| ९. | कामगार कल्याण निधी |
| १०. | सुटयांच्या दिवशी केलेले काम |

०३. **लिफाफा उघडण्याबाबतची कार्यपदधती**

- प्राप्त दरपत्रक दिनांक १४ मे २०२६ रोजी सह सचिव (नोंदणीशाखा) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या दालनात सकाळी ११.०० वा.उघडण्यात येतील.
- लिफाफे उघडते वेळी संस्थेचा एकच प्रतीनिधी उपस्थित राहू शकेल.

- लिफाफा उघडल्यानंतर तीन बाबी तपासण्यात येतील.-
  - संस्थेची सर्वसाधारण माहिती.
  - लिफाफा क्रमाक ०१ - तांत्रिक मुल्यमापन लिफाफा.
  - लिफाफा क्रमाक ०२-वित्तीय लिफाफा.

  वरिल सर्व माहिती अनिवार्य आहे.
- लिफाफा क्रमाक ०१ (तांत्रिक मुल्यमापन लिफाफा) मधील सर्व कागदपत्रांची छाननी करण्यात येईल. कागदपत्र छाननीमध्ये पात्र ठरलेल्या निविदांचाच लिफाफा क्रमांक ०२ उघडण्यात येईल.

**०४. नियुक्ती नंतरच्या अटी व शर्ती -**

- न्युनतम ( L-१) पात्र निविदाकाराला कार्यादेशात मंजुर केलेल्या रक्कमेच्या ५% इतकी रक्कम अनामत १५ दिवसाच्या आत जमा करणे बंधनकारक राहील.अनामत रक्कम जमा न केल्यास कार्यादेश रद्द करण्याचा संपूर्ण अधिकार शासनास असेल.
- निविदा स्वीकृत होऊन पुरवठा आदेश निर्गमित केल्यांनतर व करार केल्यानंतर मागणी करण्यात येणाऱ्या स्वच्छता कर्मचारी पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग येथे तात्काळ उपलब्ध करुन देणे पुरवठादारास बंधनकारक राहील.
- शनिवार, रविवार अथवा इतर शासकीय सुट्टीच्या दिवशी आवश्यकतेनुसार स्वच्छता कर्मचारी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी पुरवठादार यांची राहील.
- वित्त विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.४७/विमा प्रशासन दि. १३.०७.२०२२ नुसार कंत्राटी कर्मचारी यांचा विमा संबधीत कंत्राटदार यांनी उतरविणे बंधनकारक राहील.
- कंत्राटदारांने एकूण प्रदान केलेले वेतन, सेवाशुल्क व अन्य करांसह देयक खालील कागदपत्रे सोबत जोडून संबंधित विभागास / कार्यालयास सादर करणे आवश्यक असेल :-

  १.एकत्रित देयक.

  २.नाव व पदनामासह कर्मचाऱ्यांचा वेतन व वैधानिक देण्यांसह तपशील.

  ३.उपस्थितीबाबतचा तपशील.

  ४.भविष्य निर्वाह निधी (PF), राज्य कामगार विमा योजना (ESIS)/कर्मचारी नुकसान भरपाई (W.C.) व व्यावसायिक कर (P.T.) आदा केल्याच्या पावत्या.

  ५.एकत्रीत वेतनचिठ्ठया.
- वरील पुर्तता न झाल्यास पुरवठादार योग्य त्या कार्यवाहीस पात्र असेल व त्यास काळया यादीत (Black List) टाकले जाईल.

Jadhav
05/05/2026

(ज्ञानेश्वर जाधव)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन